सं.फौ.ख.नं.४१०/२०२१

**निशाणी क्र.०९ लगत**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव - विठ्ठल अनंता वारगड,**

वय - ५४ वर्षे, व्यवसाय – पोलिस हवालदार,

नेमणुक – भिगवण पोलिस स्टेशन.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एम.डी करे यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

**१.** मी दि.०९/०५/२०२१ रोजी भिगवण पोलिस ठाणेत पोलिस हवालदार म्हणून नेमणूकीस होतो. दिनांक ०९/०५/२०२१ रोजी मी, पोलिस कॉन्स्टेबल बोरुडे, माने असे पोलीस स्टेशनला हजर असताना मला गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शंकर पवार हा भिगवण वॉर्ड नं.१ तालुका इंदापूर, जिल्हा पुणे येथे शर्मा पेट्रोल पंपाच्या शेजारी देशी दारुची विक्री करत आहे. मी दोन पंचाना बोलावून घेतले व त्यांना घटनेबाबत माहिती दिली. त्यानंतर आम्ही खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. आम्ही रस्त्याला गाडी लावून चालत गेलो. एक इसम त्याच्या ताब्यात खाकी बॉक्स घेऊन बसला होता तो पळून जायला लागला. त्याला पकडून आणून त्याचे नाव-गाव विचारले. त्याने त्याचे नाव शंकर बाळू पवार रा.भिगवण वॉर्ड नं.१ असे सांगितले. खाकी बॉक्समध्ये १८० मिलीच्या टँगो पंच कंपनीच्या १८ बाटल्या त्याची किंमत १०८० होती. त्यातील एक बाटली काढून घेवून रासायनिक पृथक्करणकरणाकरिता पाठविले. मी आरोपी विरुध्द फिर्याद दिली. मला आता फिर्याद दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्यादीला **<u>निशाणी १६</u>** देण्यात येते. आरोपी आज कोर्टात हजर आहे. मी त्याला ओळखतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.आर नगरे यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

**२.** दि.०९/०५/२०२१ रोजी भिगवण पोलिस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणून कोण कार्यरत होते मला सांगता येणार नाही. मी घटनास्थळी जाण्यापूर्वी ठाणे अंमलदार यांना

घटनेबाबत सांगितले. हे खरे की, मी ठाणे अंमलदार यांना सांगितल्याबाबत खटल्याचे कामी कोणताही पुरावा दाखल नाही.

**३.** हे खरे की, भिगवण गाव मोठ्या प्रमाणावर पसरलेले आहे. हे खरे नाही की, भिगवण गावी घर बांधण्यासाठी देखील जागा शिल्लक नाही. हे खरे की, शर्मा पेट्रोल पंप हा हायवेला लागुन आहे. हे खरे की, त्याच्या पुर्वेस व दक्षिणेस रस्ता आहे. हे खरे की, हे तिन्ही रस्ते वर्दळीचे आहेत. हे खरे की, शर्मा पेट्रोल पंपाला लागुन घरे व दुकाने आहेत. हे खरे नाही की, मी १८ बाटल्या मुद्देमाल कारकुन यांच्या ताब्यात दिल्या. हे खरे नाही की, मला आरोपी मिळून आला नाही व मी खोटी फिर्याद दिली. हे खरे नाही की सरतपासात कथन केलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PRAJKTA RAJEEV SABNIS
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.02.20 16:46:48 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.२०/०२/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**